# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -४१०२०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com

फॅक्स नं. : ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३१
वेबसाईट: www.panvelcorporation.com


जा.क्र./पमपा/वै.आ.वि/५७६/सन २०२२-२३ दिनांक:- १६/०२/२०२३

**EXPRESSION OF INTEREST (EOI)**
**MHD/EOI-२/२०२३**

विषय: पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना सिझेरियन व गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसुती दरम्यान आवश्यकतेनुसार जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमातंर्गत रक्त पुरवठा करणेकरिता रक्तपेढीकडुन स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविणेबाबत

ग्रा.रू. / उ.जि.रु. / जि.रु. / स्त्री.रु./ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालये व मनपा क्षेत्रातील मॅटर्निटी होम / हॉस्पिटल व वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालये येथे सिझेरियन शस्त्रक्रिये दरम्यान व प्रसुति संदर्भात होणाऱ्या गुंतागुंतीचे उपचारासाठी, गर्भपात तसेच मातांना इतर शस्त्रक्रियेदरम्यान निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या उपचाराकरीता तसेच ० ते १ वर्ष बालकांकरिता रक्तसंक्रमणाची आवश्यकता भासते.

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जुने पनवेल (02) व नवीन पनवेल, कंळवोली, खारघर व कामोठे प्रत्येकी एक अशी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. सद्यस्थितीत पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये वार्षिक १६७२० ANC असुन त्यामधुन साधारण २३४ High Risk ANC आहेत. या High Risk गरोदर माताना गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसुती दरम्यान आवश्यकतेनुसार रक्त पुरवठा करणे गरजेचे असते. पनवेल महानगरपालिकेकडे स्वत:चे रुग्णालय व रक्तपेढी नाही. त्यामुळे अशा High Risk गरोदर मातांना पालिकेमार्फत रक्त पुरवठा करणेकरिता अडचणी येत आहेत.

याकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार High Risk गरोदर मातांना जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत पालिका स्तरावरुन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय क्षेत्रामधील गरोदर मातांना रक्तपुरवठा उपलब्ध करून द्यावयाचा असल्याने रक्तपेढी (Blood Bank) हि त्याच क्षेत्रात असणे आवश्यक आहे. याकरिता निश्चित केलेल्या सेवा शर्ती खालीलप्रमाणे:

१. पुरवठादार संस्थेची FDA कडे नोंदणी आवश्यक आहे.
२. मालक/संचालक/व्यवस्थापक यांचे नाव, पत्ते व संपर्क क्रंमाक सादर करणे.
३. रक्तपेढी ही सुसज्ज व FDA च्या प्रमाणांकानुसार असावी.

Scanned with CamScanner

४. रक्तपेढी पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातर्गत असावी.

५. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संदर्भित केलेल्या रुग्णांस आवश्यकतेनुसार रक्तपुरवठा (कंपनेंट / प्लेटलेट / प्लाझमा / होल बल्ड) करावयाचा आहे.

६. एक युनिट रक्तपुरवठा करण्यापोटी शासनाने निश्चित केलेला दर रु. ३००/- ते ४५०/- असा आहे.

७. एक वर्षाकरिता करारनामा (MOU) करण्यात येईल.

रक्तपुरवठा सेवा पुरविण्यास इच्छूक असलेल्या रक्तपेढीनी वरील सेवा शर्तीची पुर्तता करून दोन लिफाफे पध्दतीत (Technical and Commercial) होकारपत्र व दरपत्रक सिलबंद पाकीटात दिनांक २२.०२.२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत वैद्यकिय आरोग्य विभाग, पनवेल महानगरपालिका, मुख्यालय, पनवेल येथे स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) सादर करावे.

(डॉ. आनंद गोसावी)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
पनवेल महानगरपालिका

Scanned with CamScanner

# पनवेल महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव – पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना सिझेरियन व गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसुती दरम्यान आवश्यकतेनुसार जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमातंर्गत रक्त पुरवठा करणेकरिता रक्तपेढीकडुन स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविणेबाबत | | |
| | **दरपत्रक** | |
| **अनु. क्रं.** | **कामाचा तपशिल** | **दर (सर्व करासहित)** |
| १. | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातांना सिझेरियन व गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसुती दरम्यान आवश्यकतेनुसार जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमातंर्गत रक्त पुरवठा करणे (प्रति ०१ युनिट)<br><br>**शासनाने प्रती युनिट निश्चित केलेला दर रु.३००/- ते ४५०/-** | |
| | एकुण | |
| | अधिक/ कमी (+/-) Quoted by the Tenderer. | |

Scanned with CamScanner